# पोलीस अधीक्षक सातारा यांचे कार्यालय

## (जिल्हा विशेष शाखा, सातारा)

दुरध्वनी क्रमांक 02162- 234231

Email- pidsb.satara@mahapolice.gov.in

## *प्रेसनोट*

### गणेशोत्सव 2025 – कायद्याचे पालन करून शांततेत व उत्साहात साजरा करण्याचे आवाहन

सातारा जिल्ह्यात दिनांक 27 **ऑगस्ट** 2025 **ते** 6 **सप्टेंबर** 2025 या कालावधीत गणेशोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात येणार आहे. राज्य शासनाने यावर्षीपासून महाराष्ट्रातील गणेशोत्सवाला "**राज्य महोत्सव**" म्हणून घोषित केले आहे, या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने सार्वनिक गणेशोत्सव साजरा करण्याऱ्या मंडळांना त्याच्या विधायक कार्यासह मंडळानी घेतलेल्या चांगल्या सामाजीक उपक्रम राबवण्याऱ्या मंडळांना **राज्यस्तरीय पुरस्कार** देण्याची योजना सुरू करण्यात आली आहे.

पोलीस प्रशासनाचा उद्देश हा सार्वजनिक गणेशउत्सव शांततेत व सुरक्षिततेसह सर्वांनी आनंदी व उत्साही वातावरणात साजरा करावा हा असतो. त्या करिता नागरिकांच्या सुरक्षिततेसह विशेष करून महिला, वृध्द यांच्या सुरक्षिततेसाठी वेगवेगळे उपाय योजना - उपक्रम राबविले जातात वेगवेगळ्या सुरक्षा पथके तयार करून अशा उत्सवामध्ये कोणताही अनुचित प्रकार घडु नये यासाठी खबरदारी घेतली जाते.

सार्वजनिक मंडळांनी सार्वजनिक रित्या उत्सव साजरा करताना शासनाने दिलेल्या मर्यादा व बंधने पाळणे देखली आवश्यक आहे**.** उत्सव साजरा करताना विनाकारण व सामान्य नागरिकांना त्रास सहन करावा लागणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे. पोलीस विभाग यासाठी वेगवेगळ्या मार्गाने प्रबोधन करीत आहे तरी देखील काही व्यक्तीकडून अतिउत्साहात कायद्याचे उल्लंघन केले जाते अशा अतिउत्साही लोकांवर नाईलाजास्तव पोलीसांना कारवाई करणे भाग पडते.

**गणेशोत्सव साजरा करताना खालील बाबींची सर्व गणेशभक्तांनी/मंडळांनी काळजी घ्यावी:**

- इतरांच्या सुरक्षिततेला व शांततेला बाधा पोहोचणार नाही याची दक्षता घ्यावी.
- नियमांचे पालन करून आदर्श गणेशोत्सव साजरा करावा.
- कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस प्रशासनास सहकार्य करावे, प्रशासन देखील सतर्क आहे.
- अफवा पसरवणे, धार्मिक भावना दुखावणे, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणे यासारख्या कृतींवर **कठोर कायदेशीर कारवाई** केली जाईल.

⚖️ ***कायदेशीर तरतुदी व शिक्षा***

| अ.न. | गुन्ह्याचा प्रकार | कायदा व कलम | शिक्षा |
|---|---|---|---|
| 1. | सार्वजनिक शांततेचा भंग | BNS कलम 352 | 2 वर्षांपर्यंत कारावास, दंड किंवा दोन्ही शिक्षा |
| 2. | ध्वनी प्रदूषण (डॉल्बी/डीजे) प्रतिबंध-<br>निर्धारीत केलेल्या ध्वनी मर्यादेचे व वेळेचे उल्लंघन केल्यास अशा व्यक्तींवर किंवा संस्था किंवा व्यक्ती समुह दोषी ठरल्यास | ध्वनी प्रदुषण अधिनियम (नियमन आणि नियंत्रण) 2002 | किमान १ लाख ते ५ लाख पर्यंत दंडाची तरतुद |
| 3. | विनापरवाना मिरवणूक / आदेशाचे उल्लंघन | BNS कलम 223, म.पो.अधीनियम कलम 33, 36, 38 चे उल्लंघन | 6 महिने कारावास, ₹2500 दंड किंवा दोन्ही |
| 4. | सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान | सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंधक अधिनियम, १९८४ कलम 3, ४ | 5 वर्षांपर्यंत कारावास, दंड किंवा दोन्ही |
| 5. | वाहतुकीस अडथळा निर्माण | BNS कलम 126(2), वाहतुक अधिनियम 122,184 इ. | 1 महिना कारावास, ₹5000 दंड किंवा दोन्ही |
| 6. | शासकीय कामात अडथळा | BNS कलम 132 | कारावास, दंड किंवा दोन्ही |
| 7. | कोणताही दखलपात्र अपराध/ बेकायदेशीर कृत्य पोलीसांसमोर केल्यास अटकाव करणे | BNS कलम 170 | अटक अधिकार, १४ दिवसांपर्यंत न्यायालयीन कोठडी |
| 8. | प्लाझ्मा/लेझर लाईट्सचा वापर | नागरी सुरक्षा संहिता कलम 163 आदेशाचा भंग | बीएनएस 223 प्रमाणे 1 वर्षापयंत कैद / द्रव्यंदंड किंवा दोन्ही |

| अ.न. | गुन्ह्याचा प्रकार | कायदा व कलम | शिक्षा |
|---|---|---|---|
| 9. | धर्म, जात, भाषा, जन्मस्थान, निवास इत्यादी आधारावर समाजात द्वेष, शत्रुता किंवा असुरक्षिततेची भावना निर्माण करणाऱ्या व्यक्तींवर | BNS कलम 194(2) | 5 वर्षांपर्यंत कारावास, दंड किंवा दोन्ही |
| 10. | सामाजीक उपद्रव- सार्वजनिक ठिकाणी समाजात अस्वस्थता, गोंधळ, रस्त्यावर अडथळा करणे, धोकादायक वस्तु ठेवणे इत्यादी | BNS कलम 292 | 1000 रु पर्यंत दंड |
| 11. | *मिरवणूक, जुलूस व सार्वजनिक कार्यक्रमांचे नियमन-* कोणतीही मिरवणूक, जुलूस, सभा किंवा सार्वजनिक कार्यक्रम परवानगीशिवाय घेता येत नाही.<br>• पोलीस अधिकारी परवानगीचे अटी ठरवू शकतात, जसे की वेळ, मार्ग, आवाजाची मर्यादा, सुरक्षा व्यवस्था इ.<br>• परवानगीशिवाय किंवा अटींचे उल्लंघन केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते. | महाराष्ट्र पोलीस अधिनियम 33 (W) | 135 अन्वये 3 महीने कैद / 12500 रु दंड किंवा दोन्ही |
| 12. | *मिरवणुक तसेच कार्यक्रमातील व्यक्तींचे वर्तन कसे असावे, कोणत्याही रस्त्यावरुन किंवा सार्वनिक जागी गर्दी होणार असेल किवा अडथळा होणार असेल अशा प्रसंगी अडथळा निर्माण होवु न देणे व ध्वनीप्रदुषण अनुषंगाने लाऊड स्पीकर,कर्णकर्कश वादयांव नीयंत्रण ठेवणे/ बंदी घालणे.* | महाराष्ट्र पोलीस अधिनियम 36 | 134 अन्वये 5000 रु दंड किंवा दोन्ही |
| 13. | कोणत्याही व्यक्तींना त्रास, अशांतता, अस्वस्थता किंवा नुकसान होऊ नये किंवा त्रास, अशांतता, अस्वस्थता किंवा नुकसान होण्याचा धोका निर्माण होऊ नये म्हणुन लेखी आदेश देऊन खालील गोष्टींना आळा घालण्यासाठी मनाई करण्यासाठी, त्याचे नियंत्रण किंवा विनियमन करण्यासाठी कोणतेही गायन किंवा वादयसंगीत, कोणतेही वादय, साधन अगर पात्र किंवा जे आवाज किंवा (त्यास प्रतिध्वनी निर्माण करुन शकेल) असे यंत्र वाजविल्यामुळे होणारा आवाज करणे किंवा चालु ठेवणे, इत्यादींवर बंदी घालणे | महाराष्ट्र पोलीस अधिनियम 38 | 136 अन्वये 2 महीने कैद / 5000 रु दंड किंवा दोन्ही |
| 14. | महाराष्ट्र पोलीस अधिनियम 37, 38, 39 मधील तरतुदीनुसार आदेशाचे उल्लंघन केले असता वापरली जाण्याच्या बेतात असलेली वस्तु,जिन्नस जप्त करण्याचा पोलीसांना अधीकार | महाराष्ट्र पोलीस अधिनियम 70 | 149 अन्वये 4 हिने ते 1 वर्ष कारावास द्रव्यदंड किंवा दोन्ही |

🚫 ***प्रतिबंध व सूचना***

- मुंबई महानगरपालीका/ नगरपालीका नगरपरिषद अधिनियम 1949 मधील तरतुदीनुसार कार्यकारी अधिकारी सातारा नगरपालीका यांनी ध्वनी प्रदुषण अधिनियम (नियमन आणि नियंत्रण) 2002 अन्वये सातारा शहरातील शांतता क्षेत्र घोषीत केले आहे त्या बाबतचे फलक ठिक-ठिकाणी लावण्यात आलेल आहेत नागरीकांनी त्यांचे पालन करावे.
- **प्लाझ्मा बिम, लेझर बीम लाईट्स, प्रेशर मेड या सारख्या त्रासदायक उपकरणे/साऊंड सिस्टीम** वापरण्यास भारतीय नागरी सुरक्षा संहिता कलम 163 नुसार प्रतिबंध करण्यात आला आहे.
- **डीजे व डॉल्बी सिस्टीम** ध्वनी मर्यादेपेक्षा जास्त मर्यादेत वापरण्यास न्यायालयाच्या आदेशानुसार पूर्णतः मनाई असून जास्तीत जास्त पारंपरिक वाद्यांचा वापर करावा.
- **आवाजाचे मर्यादेचे उल्लंघन करणाऱ्या मंडळातील ध्वनीक्षपकांचे नॉईज लेव्हल मीटर**द्वारे आवाजाचे सॅम्पल घेऊन नियमभंग करणाऱ्या मंडळांवर ध्वनी प्रदुषण अधिनियम (नियमन आणि नियंत्रण) 2002 नुसार कारवाई करण्यात येईल.
- महसूल, नगरपरिषद, परिवहन, प्रदूषण नियंत्रण मंडळ, महावितरण आदी विभागांच्या नियमांचे उल्लंघन झाल्यास संबंधित विभागांशी समन्वय साधून कारवाई केली जाईल.

---

👮 ***पोलीस अधीक्षकांचे आवाहन***

"सातारा जिल्ह्याची शांतता आणि सलोख्याची परंपरा कायम राखणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. पोलीस प्रशासन आपल्यासोबत आहे आणि कोणत्याही अडचणीत सहकार्य करण्यासाठी तत्पर आहे. चला, आपण सर्व मिळून हा गणेशोत्सव सुरक्षित आणि आनंददायी साजरा करूया."